■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 03 ■ शनिवार, 01 फेब्रुवारी 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 06 ■ किंमत रू. 5

विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून 'आरंभ मराठी'ला भरभरून शुभेच्छा..!

पान क्र. २ ते ६

दैनिक
# आरंभ मराठी
arambhmarathi535@gmail.com
DAILY ARAMBH MARATHI

## सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

आरंभ मराठी । बीड

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुले याला बीड मकोका न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावलीय. विशेष म्हणजे या सुनावणीत आरोपीला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले होते. डिजिटल पुराव्यांच्या आधारे प्रकरणाच्या चौकशीसाठी आरोपीला ५ दिवसांची एसआयटी कोठडी देण्यात आली होती. मात्र आज सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी न्यायालयीन कोठडी मागितलीय आणि न्यायालयाने सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलीय.



# सोयाबीन खरेदीला मुदतवाढ

## आता ६ फेब्रुवारीपर्यंत होणार खरेदी

## जिल्ह्यातील नोंदणी केलेल्या हजारो शेतकऱ्यांना दिलासा

आरंभ मराठी । धाराशिव

**हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्रांकडून सोयाबीन खरेदीसाठी शासनाने ६ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ दिली असून, या निर्णयामुळे धाराशिव जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यापूर्वी ही मुदत ३१ जानेवारी पर्यंतच असल्यामुळे नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली होती. अखेर ३१ जानेवारी रोजी उशिरा केंद्र सरकारने एक पत्रक प्रसिद्ध करून मुदतवाढ दिली असल्याचे जाहीर केले. आत्तापर्यंत नोंदणी केलेल्या एकूण शेतकऱ्यांपैकी केवळ २५ टक्के शेतकऱ्यांच्या सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. राहिलेल्या ७५ टक्के नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची खरेदी ३१ जानेवारीपर्यंत करणे निव्वळ अशक्य असल्याने सोयाबीन खरेदीला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात यावी यासाठी शेतकऱ्यांसह सत्ताधारी व विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी मागणी करत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या सकारात्मक पाठपुराव्यामुळे आता ६ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळाली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.**

सुरुवातीला आर्द्रता आणि त्यानंतर बारदाण्याच्या तुटवड्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना हमीभाव खरेदी केंद्रांवर सोयाबीन घालता आले नाही. नोंदणीकृत शेतकऱ्यांची एकूण संख्या आणि बाजारात भाव मिळत नसल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला शेतकऱ्यांचा कल पाहता, अधिकाधिक सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव योजनेचा लाभ मिळत होता. धाराशिव जिल्ह्यात यावर्षी खरिप हंगामात ४ लाख ६२ हजार ८७२ हेक्टरवर सोयाबीनचा पेरा करण्यात आला होता. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या सोयाबीनला रास्त हमीभाव मिळावा, यासाठी जिल्ह्यात २१ हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहेत. सुरुवातीला हवामानातील बदलामुळे अपेक्षित आर्द्रता नसल्याने शेतकरी बांधवांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन घालण्यासाठी विलंब झाला. मागील आठवडाभरापासून बहुतांश खरेदी केंद्रांना बारदाण्याची चणचण भासत होती. परिणामी काही केंद्रांवरील खरेदी प्रक्रिया यामुळे ठप्प पडली होती. पाठपुराव्यानंतर बारदाना उपलब्ध झाला आणि खरेदी पूर्ववत सुरू झाली. सोयाबीनला सध्या खुल्या बाजारपेठेत अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी यंदा मोठ्या संख्येने शासकीय खरेदीकडे वळले आहेत.



### पाठपुराव्याला यश आले

सोयाबीन खरेदीला पुन्हा एकदा मुदतवाढ मिळावी याकरिता आपण राज्य आणि केंद्र सरकारकडे सातत्याने आग्रही पाठपुरावा केला होता. त्यामुळे सोयाबीन खरेदीला आता ६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मिळाल्यामुळे जिल्ह्यातील नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. हमीभाव खरेदी केंद्राचा जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होत आहे. मुदतवाढ दिल्याबद्दल सरकारचे आभार.

**-आमदार राणाजगजितसिंग पाटील**

### ८० टक्के शेतकऱ्यांची खरेदी कशी होणार ?

जिल्ह्यात ३५ हजार ४०३ शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रांकडे नोंदणी केलेली आहे. त्यापैकी १८ हजार २०९ शेतकऱ्यांना खरेदी केंद्राकडून मेसेज पाठवण्यात आले आहेत. त्यातील ७ हजार ६३९ शेतकऱ्यांच्या १ लाख ९७ हजार १९४ क्विंटल सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. नोंदणी केलेल्या संख्येच्या तुलनेत खरेदी झालेली संख्या केवळ २१ टक्क्यांच्या घरात आहे. त्यामुळे उर्वरित एक आठवड्याच्या कालावधीत ८० टक्के शेतकऱ्यांची खरेदी कशी होणार असा प्रश्न आहे.

## तुळजापूरमध्ये घराला भीषण आग



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरातील मंगळवार पेठ येथे शुक्रवारी सायंकाळी एका घराला भीषण आग लागली. या आगीमध्ये मोठे नुकसान झाले असल्याची शक्यता आहे. शुक्रवारी सायंकाळी शहरातील मंगळवार पेठ येथे पोलीस स्टेशन जवळील एका घराला आग लागली. काही क्षणातच या आगीने रौद्ररूप धारण केल्याने जवळपास तीन ते चार सिलेंडरने मोठे स्फोट झाले. त्यामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले होते. दरम्यान पोलीस स्टेशनच्या जवळच ही आग लागल्याने तात्काळ पोलिसांनी धाव येथील नागरिकांना बाहेर काढले. अग्निशामक दलाकडून ही आग विझवण्यासाठी प्रयत्न केले जात होते. या आगीमुळे किती नुकसान झाले आहे हे अद्याप स्पष्ट झाले नसून आगीचे कारण देखील अस्पष्टच आहे.

## अवैध मद्यविरोधी सात छापे, १९० लिटर गावठी दारू जप्त

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील विविध भागात सात ठिकाणी छापे टाकून १९० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली. पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.३०) अवैध मद्य विरोधी विशेष मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान सात कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेला सुमारे १,८३० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, १९० लि. गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या १८ सिलबंद बाटल्या असे मद्य जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मद्याची एकत्रीत किंमत अंदाजे १,११,३६० आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात सात गुन्हे नोंदवण्यात आले.

## धनादेश न वटल्या प्रकरणी आरोपीस धनादेशाच्या दुप्पट रकमेचा दंड

आरंभ मराठी । धाराशिव

धनादेश न वटल्या प्रकरणी आरोपीला धनादेशाच्या दुप्पट रकमेचा दंड सुनावण्याचा निर्णय धाराशिवचे मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी दिला.

यासंबधी सविस्तर वृत्त असे की, विशाल विलास देशमुख, (रा.ढोकी, ता.जि. धाराशिव) यांनी पवनराजे निंबाळकर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित धाराशिव यांच्याकडून दिनांक २९ मार्च २०११ रोजी ५०,००० रुपये कर्ज घेतले होते. त्यानंतर विशाल विलास देशमुख यांनी कर्ज रकमेचा भरणा न केल्यामुळे कर्ज खाते थकित झाले. त्यामुळे पवनराजे निंबाळकर ना. सह पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना कर्ज रकमेची मागणी केली असता, विशाल विलास देशमुख यांनी पतसंस्थेच्या हक्कात उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उस्मानाबादचा ६१,३५३ रुपयांचा धनादेश दिला. सदरचा धनादेश न वटल्यामुळे पतसंस्थेने विशाल विलास देशमुख यांच्याविरुद्ध निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वये मा. मुख्य न्यायदंडाधिकारी उस्मानाबाद यांच्या न्यायालयात प्रकरण एस.सी. सी.नं. १०५८/२०१४ दाखल केले. या प्रकरणी साक्षी पुरावा होवुन सुनावणीअंती फिर्यादी पत्तसंस्थेने अभिलेखावर दाखल केलेले पुरावे व पतसंस्थेच्या वतीने पतसंस्थेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर महादेव भोसले यांनी दिलेली साक्ष व पतसंस्थेच्या वतीने ॲड. आर.एस. मुंढे यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरुन दिनांक २० जानेवारी रोजीच्या निर्णयानुसार अति. मुख्य न्यायादंडाधिकारी एस डी कामत यांनी आरोपीस शिक्षा सुनावली. यावेळी आरोपीस धनादेशातील नमुद रक्कमेच्या दुप्पट दंड म्हणजेच १,२२,७०६/- रुपये व त्या रक्कमेवर फिर्याद दाखल केल्यापासुन ते रक्कम पुर्णपणे वसुल होईपर्यंत द.सा.द.शे.९% व्याज दराने व्याज देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच नुकसान भरपाईची रक्कम अदा न केल्यास सहा महिन्याची साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. या प्रकरणी ॲड. रमेश शहाजी मुंढे यांना ॲड. प्रशांत लोंढे व ॲड. सचिन अंबर यांनी विशेष सहाय्य केले.

## उत्कृष्ट बँकिंग सेवा, श्री.सिध्दीविनायक मल्टिस्टेटला बँको ब्लू रिबन पुरस्कार

आरंभ मराठी । धाराशिव

येथील श्री.सिध्दीविनायक मल्टिस्टेटला बँको ब्लू रिबन हा बँकिंग क्षेत्रातला उत्कृष्ट कार्यक्षमता आणि विश्र्वासार्हतेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. या प्रतिष्ठित पुरस्काराने यंदा बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या संस्था व व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

सहकारी संस्थांसाठी लोणावळ्यात दोन दिवसीय ॲडव्हान्टेज सहकार परिषद पार पडली. या परिषदेत सहकार क्षेत्रातील महत्त्वाचे विषय चर्चिले गेले, तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. राज्यभरातील नामवंत सहकारी संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित होते. याच पार्श्र्वभूमीवर बँको ब्लू रिबन पुरस्कार वितरण सोहळा झाला. यावर्षी श्री सिद्धिविनायक मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीला 'सर्वोत्कृष्ट संस्थेचा' पुरस्कार प्रदान करण्यात आला. ग्राहकांना उत्कृष्ट बँकिंग सेवा पुरवण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे, या समर्पित कार्याची दखल घेत या पुरस्काराने सन्मान करण्यात आला. हा सन्मान मिळाल्याने संस्थेची जबाबदारी आणखी वाढली असून, भविष्यात अधिक नवनवीन उपक्रम राबवण्यास नवसंजीवनी मिळाली असल्याचे मल्टिस्टेटचे सर्वेसर्वा दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले. माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार जाधव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी अरविंद गोरे, रामचंद्र सारडे आणि देविदास कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी संस्थेच्या ठेवीदार आणि सभासदांनी सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. हा पुरस्कार बँकिंग आणि सहकार क्षेत्रात नव्या संधी निर्माण करण्यास, तसेच कार्यक्षमतेत वाढ करण्यास निश्र्चितच प्रेरणा देईल.




## मोटारसायकल विक्री करायची असल्याचे सांगून २५ हजारांची ऑनलाइन फसवणूक

आरंभ मराठी । तुळजापूर

मोटारसायकल विकायची आहे म्हणून तुळजापूर येथील एका तरुणाची मुंबई येथील अज्ञात व्यक्तीने २५ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी प्रमोद बाळकृष्ण गवळी (वय२५ वर्षे, रा. शुक्रवार पेठ कणे गल्ली तुळजापूर) यांना दिनांक ४ जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान मोबाईल फोनवर ९१७७०९४१०४०५ या क्रमांकाच्या नंबरवरून अज्ञाताने फोन केला व मी वाशी, नवी मुंबई येथुन बोलत असुन मला माझी यमाहा आर.एक्स १०० ही गाडी विकायची आहे, तुम्हाला सेकंड हॅण्ड यमाहा आर एक्स १०० गाडी खरेदी करायची आहे का? असे सांगून मी तुम्हाला ओळखतो असे त्यांनी सांगितले. तसेच गाडीची किंमत ठरवून फिर्यादीकडून ११,००० रुपये व त्यांचा मित्र सागर विठ्ठल जाधव यांच्याकडून १४,५०० रुपये अशा एकुण २५,५०० रुपयांची फसवणुक केली. याप्रकरणी प्रमोद गवळी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन सायबर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३१८(१) सह ६६(सी), ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



## शहरातील अतिक्रमणावर सलग दुसऱ्या दिवशी हातोडा

### छत्रपती शिवाजी महाराज चौक झाला मोकळा

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरात सार्वजनिक जागेवर केलेल्या अतिक्रमणाच्या विरोधात सार्वजनिक बांधकाम विभागाने सलग दुसऱ्या दिवशी मोठी कारवाई करत अतिक्रमणावर बुलडोझर फिरवला. गुरुवारी ख्वाजा नगर, मार्केट यार्ड, तुळजापूर नाका या परिसरातील अतिक्रमणे हटवली होती. तर शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हा परिषद, नगर परिषद च्या समोरील भाग ते मध्यवर्ती प्रशासकीय इमारत या भागातील दोन्ही बाजूंनी अतिक्रमणे हटवली. छत्रपती शिवाजी महाराज चौकाने मोकळा श्वास घेतला असून, अतिक्रमणे हटवल्यामुळे चौकाचा मोठा परिसर मोकळा झाला आहे. हा परिसर मोकळा झाल्यामुळे या भागातील सततच्या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत फक्त कारवाईचा फार्स करणाऱ्या बांधकाम विभागाने व पालिका प्रशासनाने यावेळी धडक कारवाई करत अतिक्रमण केलेली दुकाने अक्षरशः उध्वस्त करून टाकली. दरवेळी अतिक्रमण काढताना किरकोळ पत्रे काढणाऱ्या बांधकाम विभागाच्या प्रशासनाने यावेळी सिमेंट कॉंक्रेटच्या मजबूत बांधकामावर हात घातला आणि बांधकाम जमीनदोस्त केले. नगर पालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही अतिक्रमण विरोधी धडक मोहीम राबविण्यात येत आहे. शुक्रवारी देखील या मोहिमेदरम्यान कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अतिक्रमण हटाव पथक पोहोचण्यापूर्वीच नागरिकांनी स्वतः अतिक्रमण केलेला भाग मोकळा करण्यास सुरुवात केल्याचे चित्र दिसत होते. त्यामुळे वादावादीचे प्रसंग उद्भवले नाहीत. शुक्रवारी तीनशे पेक्षा अधिक अतिक्रमणे हटवली असल्याचा दावा बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी केला. सध्या ही मोहीम मध्यवर्ती प्रशासकीय इमारती पर्यंत पोहोचली असून, पुढेही ही कारवाई अशीच सुरू राहणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी दोन ट्रॅक्टर, तीन जेसीबी आणि इतर वाहनांच्या साहाय्याने ही अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आली.





अतिक्रमण मोहीम येण्याच्या पूर्वीच नागरिकांनी स्वतः होऊन अतिक्रमण केलेल्या भागातील साहित्य काढून घेतले

## उभ्या असलेल्या मालवाहतूक ट्रकमधील अडीचशे लिटर डिझेलची चोरी

### इटकळ, खानापुर परिसरात डिझेल चोरीच्या घटना वाढल्या

आरंभ मराठी । इटकळ

सोलापुर - हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील खानापूर नाका येथे उभ्या असलेल्या मालट्रक मधील अडीचशे लिटर डिझेल मंगळवारी (दि.२८) पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. महामार्गवरील खानापुर नाका येथे (एपी १६ टीजे ५०५९) या ट्रकमध्ये बिघाड झाल्याने रस्त्याच्या कडेला उभा होता. पहाटेच्या सुमारास कार मध्ये आलेल्या चोरट्यांनी मोटारीच्या साहाय्याने डिझेलची टाकी फोडून त्यामधील अंदाजे २५० लिटर डिझेल लंपास केले. यावेळी ड्रायव्हरने त्यांना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला पण चोरटे पळून गेले. याबाबत पोलिस स्टेशनमध्ये ड्रायव्हरने कोणतीही तक्रार नोंदवली नाही. इटकळ, खानापुर व परिसरात महामार्गावर उभा असलेल्या वाहनातील डिझेल चोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढले आहे. परंतु पोलिसांना याचा छडा लावण्यात यश येत नाही. चोरटे पोलिसांच्या हातावर तुरी देऊन निघुन जात आहेत.यामुळे वाहनचालकामध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.याबाबत पोलिसांनी याकडे लक्ष देऊन याचा तपास करावी ही मागणी करण्यात येत आहे.



## मोबाईलचा अतिरेकी वापर वाढला

सध्या माणसाचा सर्वाधिक वेळ कुठे खर्च केला जातो? या प्रश्नाचे उत्तर सर्वांनाच माहिती आहे. तरीसुद्धा सांगतो, लोकांचा सर्वाधिक वेळ स्क्रीन हाताळण्यात जातो. सकाळी उठल्यापासून तर रात्री उशिरा झोपी जाण्यापर्यंतचा वेळ फक्त मोबाईलच्या स्क्रीनवर घालविला जातो. अगदी ३ वर्षाच्या मुलापासून तर ७० वर्षांच्या वृद्धापर्यंत साऱ्यांनाच या स्क्रीन टाईमने पछाडलेले आहे. कोरोनानंतर मोबाईल हाताळणाऱ्यांच्या संख्येत कोट्यवधीने वाढ झाली. मोबाईल आता केवळ भ्रमणध्वनी राहिला नसून तो लोकांच्या जगण्याचा एक माध्यम ठरू लागला आहे. मोबाईलवर सर्वच कामे चुटकीसरशी होत असल्याने आणि हे साहित्य खिशात सतत असल्याने मोबाईलचा अतिरेकी वापरही वाढला आहे. प्रती दिवस दोन तासांवरून मोबाईलचा वापर चार तासांहून अधिक होऊ लागला आहे. मोबाईलच्या या अतिरेकी वापरामुळे विविध शारीरिक व मानसिक तक्रारी माणसाच्या आयुष्यात निर्माण झाल्या आहेत. एका आकडेवारीनुसार झोपेतून उठल्यानंतर ८५ टक्के लोक अवघ्या १५ मिनिटातच फोन चेक करतात. फोन मिळाला नाही तर ते अस्वस्थ होतात. ३१ टक्के लोक झोपण्याचा वेळ जागून मोबाईलमध्ये खर्च करतात. मोबाईलचा वापर दिवसागणीक वाढू लागला आहे. रिल्स, व्हिडीओ, संगीत, ओटीटी, मुव्ही या गोष्टींसाठी ५० ते ५५ टक्के लोक मोबाईलचा वापर करतात तर मेल, संदेश आणि कॉलिंग करण्यासाठी २० ते २५ टक्के लोक मोबाईलची स्क्रीन वापरतात. प्रवास, विविध प्रकारची माहिती जाणून घेण्यासाठी; शिवाय रेसीपी आणि नोकरीसंदर्भातील माहिती मिळविण्यासाठी केवळ ७ ते ९ टक्के लोक मोबाईलया वापर करतात. ऑनलाईन खरेदीसाठी ५ ते ७ टक्के लोकांना मोबाईलची गरज भासते. गेमिंग खेळणाऱ्यांमध्ये ८ ते ९ टक्के लोकांचा समावेश असून यातही बालकांचे प्रमाण मोठे आहे. दिवसभरामध्ये एक व्यक्ती आपला फोन सरासरी ८० वेळा बघतो, हे अतिशय भीतिदायक चित्र आहे. स्क्रीनचा वापर किती करायचा, मोबाईलमध्ये काय बघायचे त्याला किती प्राधान्य द्यायचे हे ठरविणे आता लोकांच्या हाती राहिलेले नाही.. पूर्वी शाळेतून मुलांच्या अभ्यासासाठी व इतर माहिती पालकांना देण्यासाठी स्कूल डायरी वापरली जायची. त्या डायरीत विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल, त्याच्या अभ्यासाबद्दल, त्याच्या होमवर्कबद्दल वेगवेगळ्या विषयांच्या शिक्षकांकडून माहिती लिहून पाठविली जात होती. मात्र, आता शाळांनी आपले स्वतःचे ॲप उघडले आहे. काही शाळांनी व्हॉट्सॲपवर पालकांचा ग्रुप तयार करून त्यावरच संपूर्ण माहिती टाकणे सुरू केले आहे. तुमची इच्छा नसतानासुद्धा तुम्हाला असे ॲप चेक करावेच लागतात. ज्या मुलांना मोबाईल बघणे वाईट आहे, डोळे खराब होतात, जास्त वेळ मोबाईल वापरू नको असे सांगणाऱ्या पालकांनाच नाईलाजास्तव मुलांच्या हाती मोबाईल द्यावा लागतो आहे. कोरोनाच्या काळात तर सर्वच शाळांनी ऑनलाईन क्लासेस घेतले. या क्लासेसमधून विद्यार्थ्यांना काहीही कळत नसताना विद्यार्थी तासन्तास मोबाईलपुढे बसलेले असायचे आणि आजही तीच परिस्थिती दिसून येत आहे. मुलांचा अभ्यास मोबाईलशिवाय घेणे हे पालकांनाही शक्य नाही. वाचन संस्कृती मोबाईलमुळे लोप पावत चालली असून विनाकारण लोक आपला वेळ मोबाईलच्या स्क्रीनवर रिल्स, गेम्स बघण्यात घालवू लागली आहे. एका सर्वेनुसार ६५ टक्के लोक मोबाईलची बॅटरी संपल्यामुळे अस्वस्थ होतात. ४० टक्के लोक स्मार्ट फोन घेऊनच घराबाहेर पडतात. ८७ टक्के लोकांना तर मोबाईल चार्ज होण्याचा धीरदेखील नसतो; ते मोबाईल चार्ज होत असतानाच स्मार्ट फोन वापरतात. ४६ टक्के लोक दिवसातून दोन वेळा फोन चार्ज करतात. याचा अर्थ लोक स्क्रीन टाईमवर आपला किती वेळ वाया घालवितात, हे दिसून येईल. २०१० मध्ये प्ले स्टोअर्स पची संख्या ०.१ लाख होती; १० वर्षांनंतर ती ३५ लाखांच्या वर पोहोचली आहे. १० वर्षांपूर्वी स्मार्ट फोनची विक्री ०.३ अब्ज होती, ही संख्या आताच्या घडीला १.४ अब्जापर्यंत पोहोचली आहे. १० वर्षांपूर्वी किती लोकांकडे इंटरनेट होते हे तपासले असता केवळ ०.१ टक्के लोकंच इंटरनेटचा वापर करीत होते. आता मात्र इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ७१ टक्के झाली आहे. मोबाईलचा दैनंदिन वापर पूर्वी दोन तासांचा होता; तो आता चार तासांहून अधिक झालेला आहे. ही आकडेवारी निश्चितच चिंताजनक आहे. मोबाईल आणि स्मार्ट फोनच्या आहारी गेलेल्या लोकांनी एकदा चिंतन करण्याची गरज आहे. मोबाईलमुळे जीवन जगणे शक्य वाटत नसले, तरी त्याचा वापर किती करायचा, कुठल्या कामासाठी करायचा हे एकदा ठरविण्याची गरज आहे. दिवसाचा किंवा आठवड्याचा आपला स्क्रीन टाईम प्रत्येकानेच तपासण्याची गरज आहे. अन्यथा याच्या दुष्परिणामाला आपल्यालाच सामोरे जावे लागेल.

## विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून 'आरंभ मराठी'ला भरभरून शुभेच्छा..!



दैनिक आरंभ मराठीचा प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने गुरुवारी सायंकाळी धाराशिवमध्ये स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित आला होता. या कार्यक्रमात सामाजिक, राजकीय, साहित्य, कला, शिक्षण,शासकीय, शेती, पत्रकारितेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आरंभ मराठीला भरभरून शुभेच्छा दिल्या. (छायाचित्र आरिफ शेख, आकाश तांबे)





















## अंतरीची प्रार्थना

प्रत्येक माणसाचं आयुष्य समस्यांनी भरलेलं असतं. या सगळ्या समस्यांवर मात करण्यासाठी माणूस बाहेर मार्ग शोधत असतो. मात्र या शोधात त्याला खरी दिशा मिळते ती अंत:करणातून उमटणाऱ्या प्रार्थनेच्या शक्तीने. प्रार्थना ही फक्त शब्दांमध्ये व्यक्त होणारी कृती नाही, तर ती मनातल्या विचारांना, भावनांना, आणि इच्छा-आकांक्षांना एका उच्च शक्तीपर्यंत पोहोचवण्याचा साधा पण प्रभावी मार्ग आहे. प्रार्थनेमुळे माणसाला स्वतःशी आणि देवत्वाशी संवाद साधण्याची संधी मिळते. ही केवळ धार्मिक कृती नसून माणसाला शांतता, समाधान, आणि उभारी देणारी जीवनशैली आहे.

प्रार्थनेचं स्वरूप हे केवळ बाह्य कृतीत दिसणारं नसतं. ती मनातल्या आंतरिक भावनांचं प्रतिबिंब असते. माणूस जेव्हा प्रार्थनेत आपलं मन रमतं, तेव्हा त्याच्या आत सकारात्मक उर्जेची लहर येते. ती तणाव कमी करून मनाला शांती देते. महात्मा गांधी म्हणत, Prayer is the food of my soul. त्यांचा विश्वास होता की प्रार्थना ही आत्म्याचं पोषण करते आणि मनाला शांततेची दिशा देते. ही एक अशी प्रक्रिया आहे जिच्या माध्यमातून माणूस आपले मनः स्वास्थ्य, आत्मविश्वास, आणि अंतःप्रेरणा जपत राहतो. प्रार्थनेच्या या सखोलतेमुळे ती केवळ वैयक्तिक समाधानापुरती मर्यादित राहत नाही; ती समाजाला आणि जगाला नवी दिशा देण्याचा विचार रुजवते.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानाच्या माध्यमातून प्र ा र्थ ने च महत्त्व जगासमोर मांडलं. त्यांचे जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। हे शब्द फक्त त्यांचे वैयक्तिक विचार नव्हते, तर ते अखंड विश्र्वासाठी प्रार्थना होती. पसायदानाच्या ओळींमध्ये त्यांनी संपूर्ण मानवजातीसाठी शांतता, मैत्री, आणि सद्भावनेची मागणी केली आहे. त्यांची ही प्रार्थना एक आदर्श उदाहरण आहे की प्रार्थना केवळ वैयक्तिक इच्छांसाठी नसते, ती इतरांसाठीही असावी. प्रार्थनेच्या या समर्पणामुळेच ती अधिक परिणामकारक ठरते.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगांमधूनही प्रार्थनेचं महत्त्व ठळकपणे समोर येतं. त्यांच्या अभंगांमधील देवाचिया दारी उभा क्षणभरी। लाभला भारी समाधान। या ओळी सांगतात की प्रार्थनेमुळे देवाशी संबंध जोडला जातो आणि मनःशांती मिळते. तुकाराम महाराजांनी प्रार्थनेला आयुष्याला नव्याने घडवण्याचं साधन मानलं आहे. त्यांच्या विचारांमध्ये प्रार्थना ही अंतःकरणाच्या गाभ्यातून उगम पावणारी पवित्र प्रक्रिया आहे. ती माणसाला आपल्या मनातील द्वेष, राग, आणि अहंकार यांचं निर्मूलन करण्याची प्रेरणा देते.

विज्ञानही प्रार्थनेचं महत्त्व अधोरेखित करतं. संशोधनांनी सिद्ध केलं आहे की प्रार्थना केल्याने मानसिक ताण कमी होतो, मन स्थिर राहतं, आणि सकारात्मक विचारांची वृद्धी होते. प्रार्थना ही केवळ धार्मिक परंपराच नाही, तर ती मनःशांती आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठीही उपयुक्त आहे. ओशर अँड अँशर या आधुनिक पद्धतीमध्ये प्रार्थनेचा उपयोग मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी केला जातो. त्यामुळे प्रार्थनेचं महत्त्व केवळ अध्यात्मापुरतं सीमित राहत नाही, तर ते शास्त्रीय पातळीवरही अधोरेखित केलं जातं. प्रार्थना माणसाच्या आयुष्यात नवा आशावाद निर्माण करते. ती मनातली नकारात्मकता दूर करून जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित करते. प्रार्थनेमुळे मनाची शुद्धता वाढते आणि माणूस स्वतःचं आत्मपरीक्षण करू लागतो. प्रार्थना ही माणसाला स्वतः च्या चुकांचं भान देते आणि त्याच्या आयुष्याला नवी दिशा मिळवून देते. ती त्याच्या जीवनाला स्थिरता प्रदान करते. ही प्रक्रिया माणसाच्या अंतरिक जगात परिवर्तन घडवून आणते आणि त्याला शांती व स्थैर्य प्रदान करते.



**प्रविण जरीचंद माळवदे**
मो नं -८६०५५३११९९
धाराशिव

प्रार्थना ही केवळ वैयक्तिक समाधानासाठी नसून ती एक सामाजिक बांधिलकीदेखील आहे. संत ज्ञानेश्र्वर महाराजांच्या पसायदानापासून ते महात्मा गांधींच्या प्रार्थनेच्या विचारांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी प्रार्थनेचा उपयोग माणसाला अधिक संवेदनशील आणि मानवतावादी बनवण्यासाठी झाल्याचं दिसतं. प्रार्थनेतून माणसाला देवत्वाशी नातं जोडण्याची प्रेरणा मिळते. ती त्याला संपूर्ण विश्र्वाचा एक भाग असल्याचं भान देऊन त्याच्या कर्तव्यात सकारात्मकता आणते.

प्रार्थनेचं महत्त्व त्याच्या परिणामकारकतेत दडलेलं आहे. प्रार्थनेतून निर्माण होणारी शक्ती ही जीवनाला एक नवीन दिशा देणारी असते. ती मनःशांतीसाठी, आत्मशुद्धीसाठी, आणि जीवनाला समृद्ध बनवण्यासाठी मार्ग दाखवते. म्हणूनच, प्रार्थना ही जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ती आत्म्याचं पोषण करणारी शक्ती आहे, जी प्रत्येकाला नवी उभारी देऊन आयुष्याला अधिक अर्थपूर्ण बनवते.

## धनादेश अनादरीत प्रकरणी आरोपीस पाच लाखांचा दंड व तीन महिने कारावासाची शिक्षा

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव येथील प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी दत्तात्रय साठे यांनी दिनांक ३० जानेवारी रोजी धनादेश अनादरीत प्रकरणी आरोपीस ३ महिने कारावास व पाच लाख रूपयांच्या दंडासह पाच हजार रूपये खर्चाची शिक्षा सुनावली. या प्रकरणातील आरोपी संजय महादेव माने (रा. येवती) यांनी जयलक्ष्मी शुगर प्रॉडक्टस प्रा. लि. नितळी यांच्यासोबत ऊस तोड वाहतुकीचा करार केला होता. त्यांनी जयलक्ष्मी साखर कारखान्याकडून वसंतदादा बँकेतुन ४,५०,०००/- रुपये आगाऊ उचल घेतली होती. त्यांनी रक्कम उचल घेऊन व ऊस तोड वाहतुक करार करूनही जयलक्ष्मी कारखान्यास ऊस वाहतुक केली नाही आणि जयलक्ष्मी साखर कारखान्यास अडचणीत आणले. त्यांनतर आरोपीकडे कराराप्रमाणे कारखान्याने काम न केल्याने रक्कम परत मागितली असता, आरोपीने जयलक्ष्मी साखर कारखान्यास ३,५०,०००/- रुपयांचा चेक २०१३ साली दिला व चेक वटवून रक्कम मिळेल अशी हमी दिली. सदर चेक वटण्यासाठी बँकेत जमा केला असता, धनादेश खात्यावर पुरेशी रक्कम नसल्याने अनादरीत झाला. त्यानंतर धनादेश अनादरीत झाल्याने जयलक्ष्मी कारखान्याद्वारे सुरेश भोरे यांना न्यायालयीन कामासाठी नेमले व सुरेश भोरे यांनी जेष्ठ विधिज्ञ ॲड. विजयकुमार शिंदे यांच्या तर्फे रक्कम मागणीची नोटीस आरोपीस दिली. परंतु आरोपीने जयलक्ष्मी कारखाण्यास रक्कम परत न दिल्याने ॲड. विजयकुमार शिंदे यांच्याकडून कलम १३८ एन.आय. क्ट प्रमाने सुरेश भोरे यांनी फिर्याद कोर्टात दाखल केली. पुढे सुरेश भोरे यांनी कारखाण्याचे काम सोडल्यावर फिर्यादी म्हणून संजय रामचंद्र दुबे यांनी या प्रकरणात काम पाहिले. फिर्यादी तर्फे संजय रामचंद्र दुबे व वसंतदादा बँकेचे मॅनेजर मुंडे यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यानंतर ॲड. विश्वजीत शिंदे यांनी केलेला अंतिम युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधिश साठे यांनी आरोपी संजय महादेव माने यांना तीन महिने कारावास व पाच लाख रूपये दंड आणि पाच हजार रूपये खर्च अशी शिक्षा सुनावली. सदर प्रकरणात शिंदे लॉ फर्म यांनी फिर्यादी जयलक्ष्मी कारखान्यातर्फे न्यायालयीन काम पाहिले. प्रकरणात ॲड. विजयकुमार शिंदे व ॲड. विश्वजीत शिंदे यांना ॲड. अजित राठोड, ॲड. भाग्यश्री रणखांब, ॲड. ज्योती जगताप व ॲड. पृथ्वीराज दंडनाईक सह मोहरील पवन पांचळ यांनी सहकार्य केले.

## आर्थिक साक्षरतेपासून वंचित महिला वर्ग

सप्टेंबर २०२३ महिन्याच्या दरम्यान एक आई मुलीला सोडण्यासाठी शाळेमध्ये आली होती .शाळेमध्ये तिचा रडवेला चेहरा पाहून सहज विचारलं ताई का हो काय झाले ?तुम्ही थोडे तणावाखाली वाटत आहात. तेव्हा ती बाई आणखीनच रडायला लागली व सांगितलं मॅडम सणावाराचे दिवस आहेत, म्हणून कामावरील बायकांनी दिलेले पैसे धान्यामध्ये लपवून ठेवले होते.पण पाहते तर काय ते तिथे सापडत नाहीत.नक्की नवरा घेऊन गेला बघा ,आता सगळे पैसे खर्च करेल तेव्हाच घरी परत येईल.कसं करायचं हो आम्हा बायकांनी ?मॅडम एवढे कष्ट करून पण काहीच करता येत नाही ,असे बोलून रडत रडत ती निघून गेली.

पण त्या वेळेला मनात विचार आला की खरंच भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली तरीही खऱ्या अर्थाने महिलावर्ग आर्थिक साक्षर झाला आहे का? महिला साक्षरता जरी वाढली असली तरी आर्थिक दृष्ट्या महिला साक्षर आहे का ? तेव्हा अनेक माता पालकांशी, समाजातील इतर महिलावर्गांशी चर्चा करण्यास सुरुवात केली आणि एका निष्कर्षापर्यंत पोहोचले की काही प्रमाणात बचत गट, बँकांमधील स्वतः चे खाते या माध्यमातून थोडीफार आर्थिक जाणीव महिलांना झाली आहे.पण हे काम सर्वच स्तरातील महिलांमध्ये पोहोचलेले नाही. यावर काहीतरी कृतिशील काम करूयात या दृष्टीने पोस्टातील कर्मचाऱ्यांशी संपर्क करून दहा वर्षाच्या आतील मुलींच्या नावे सुकन्या समृद्धी खाते ,महिला सन्मान मधील चांगले व्याजदर असणाऱ्या काही ठेवी अशा प्रकारचे काही खाते महिलांना पोस्टात शाळेच्या माध्यमातून काढून देण्यास सहकार्य कर करता आले.यावेळी पोस्टातील काही कर्मचारी बँकेतील काही कर्मचारी यांनी शाळा स्तरावर सर्व मातापालकांशी सहविचार सभेतून आपले पैशाची बचत कशी करावी? ती बचत योग्य पद्धतीने आपण कुठे साठवावी ?त्या बचतीवर व्याजदर कसे आकारले जाते? त्याचा आपल्याला कसा फायदा होऊ शकतो? मुलांच्या शिक्षणासाठी ,दवाखान्यासाठी अशा अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी आपण आपली बचत कशी उपयोगी आणू शकतो.याचे योग्य मार्गदर्शन महिलांना करण्याचा उपक्रम शाळेने राबवला . तसेच यामध्ये काही सुशिक्षित महिला आहेत ज्यांनी थोड्या थोड्या पैशांच्या बचतीतून बँकेच्या मदतीने काही महिलांनी स्वतःच्या घराचे बांधकाम पूर्ण केले ,मुलांची शिक्षण, विवाह, दवाखान्याचे काही प्रसंग यामध्ये त्याची कशी मदत झाली ?याविषयीची चर्चा इतर महिलांशी केली.

हा उपक्रम घेत असताना आपण स्वावलंबी होत आहोत , आपले हक्काचे खाते आहे, आपण व्यवहार करू शकतो ,कोणाचीही मदत न घेता एक विश्र्वासाच्या ठिकाणी आपण स्वतःची बचत जमा करू शकतो, आपल्याला आवश्यक वेळी आपण ते पैसे काढू शकतो याचा आत्मविश्र्वास महिला वर्गामध्ये जागृत करणारा ठरला.

याचा दुसरा भाग मला आवर्जून इथे व्यक्त करावासा वाटतो तो म्हणजे काही अर्थशास्त्रामध्ये पदवी शिक्षण पूर्ण करणारी मुले मुली धाराशिव शहरांमध्ये महिलांच्या मुलाखती घेण्यासाठी काही प्रश्नावली घेऊन प्रत्येक कार्यालय ,शाळा ,दवाखाने यामध्ये सर्वेसाठी जात होती.अशीच काही विद्यार्थी माझ्या शाळेवर आले त्यात आर्थिक व्यवहाराशी संबंधित २० ते २५ प्रश्न होते त्या प्रश्नावलीनुसार ते महिला वर्गातील आर्थिक साक्षरता तपासण्याचा प्रयत्न करत होते .तेव्हा त्यांनी त्यांच्या एकूण सर्वे मधला काही घटक माझ्याशी चर्चा केली असता जाणवले की कितीतरी उच्च पदस्थ, महिला कर्मचारी असतील किंवा वेगवेगळ्या पदावर कार्यरत महिला असतील स्वतः महिन्याला सॅलरीच्या रूपामध्ये मोठी रक्कम कमवत असताना देखील त्या रकमेचा विनियोग कसा करायचा ?त्याची बचत कशी असावी ,तो कुठे इन्वेस्ट केला पाहिजे ?त्याच्यावर व्याजदर कसा असतो ?आपल्याला रिटर्न्स कसे मिळतात ?आपण होम लोन किंवा इतर लोन घेत असताना त्याचे हप्ते कसे फेडतो ?त्यानुसार मुद्दल किती जाते ?व्याजदर किती असतो ?या आणि अनेक प्रश्नांसाठी आपल्या पतीवर अवलंबून असलेल्या दिसल्या .अक्षरशः काही महिलांना आपला स्वतःचा पूर्ण पगार देखील आकड्याच्या स्वरूपात माहित नाही !असे भयानक सत्य त्या सर्वेक्षणा मधून बाहेर पडत होते.आपण कमवत असलेल्या पैशास कुठल्या पद्धतीने वापरावे ?काय करावे ?यासाठीही महिलावर्ग पुरुषांवर अवलंबून असलेला जास्ती उदाहरणांमध्ये दिसून येतो .तिच्याकडे आत्मविश्वास नाही की त्याबद्दल अजूनही अज्ञान आहे? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे .पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला कार्य करत असते. तिच्यामध्ये जिद्द, चिकाटी ,बचत ही गुण निसर्गतः असतात त्या गुणांचे कौतुक करणे, त्यांना प्रोत्साहन देणे हे जरी होत असले तरी सर्वार्थाने तिला आर्थिक साक्षरतेकडे उद्देश पूर्णरित्या घेऊन जाण्यासाठी शासनाने तसेच समाजाने येत्या काळामध्ये काही उपक्रम घ्यावेत. त्यांच्या अशा कार्यशाळा व्हाव्यात .त्यांना आर्थिक साक्षरतेने सबल करण्यासाठी प्रयत्न व्हावेत,असे मला वाटते.जेव्हा महिलावर्ग आर्थिकदृष्ट्या साक्षर होईल तेव्हा नक्कीच महाराष्ट्राच्या, भारताच्या नव्हे तर जागतिक दृष्टीने ही एक आर्थिक सुबत्ता वाढेल.



**सोनाली आरडले/गुडे**
प्राथमिक शिक्षिका ,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
राजीव गांधी नगर ,धाराशिव

आज निर्मला सीतारमण सारखी महिला अर्थशास्त्राचे नेतृत्व करताना पहावयास मिळते पण त्या दृष्टीने तेवढ्या प्रमाणात समाजातील महिला आर्थिक साक्षर झालेली नाही .हा महिलांमधील आर्थिक साक्षरतेबद्दल असणारा अविश्र्वास, अज्ञान दूर करण्यासाठी पुढील काळात प्रयत्न व्हावा.

आज आपण पाहतोय ऑनलाईन आर्थिक व्यवहार वाढत आहे आणि ती काळाची गरजही आहे.अशामध्ये ऑनलाईन शॉपिंग चे प्रमाण महिला वर्गामध्ये जास्त असते आणि याच ठिकाणी बरेचदा त्यांची फसवणूकही होत आहे .ऑनलाइन व्यवहार कसा करावा ?याबद्दलचे पूर्ण ज्ञान महिला वर्गाला या काळात असणे आवश्यक आहे . सायबर गुन्हे वाढत आहेत.यामध्ये टक्केवारीच्या प्रमाणात विचार केला तर महिला वर्गांमध्ये सायबर गुन्ह्यात बळी पडण्याचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत जास्त आहे .त्या लवकर इतरांवर विश्र्वास ठेवतात ,कुठल्याही अफवा ,भूल थापा यावर अगदी काही क्षणातच महिला विश्र्वास ठेवतात.यामुळे ऑनलाइन सायबर गुन्ह्यांमध्ये महिलांची फसवणूक होत आहे.तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ऑनलाइन व्यवहार अनिवार्य आहे अशा परिस्थितीमध्ये त्याचे पूर्ण ज्ञान मिळवणे व मगच व्यवहार करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी असणारी पुस्तके, शासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना, आरबीआयच्या महत्त्वाच्या सूचना यांचे वेळोवेळी पालन महिला वर्गाकडून होणे आवश्यक आहे.या संदर्भातही जनजागृती होणे ही काळाची गरज आहे. चला तर मग भारताला आर्थिक सुबत्तेतेकडे नेण्यासाठी आपल्या महिला भगिनींना संक्रांतीची सुंदर भेट म्हणून वेळीच आर्थिक साक्षर बनवूया.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून 'आरंभ मराठी'ला भरभरून शुभेच्छा..!



दैनिक आरंभ मराठीचा प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने गुरुवारी सायंकाळी धाराशिवमध्ये स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित आला होता. या कार्यक्रमात सामाजिक, राजकीय, साहित्य, कला, शिक्षण,शासकीय, शेती, पत्रकारितेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आरंभ मराठीला भरभरून शुभेच्छा दिल्या.
(छायाचित्र आरिफ शेख, आकाश तांबे)




























# विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून 'आरंभ मराठी'ला भरभरून शुभेच्छा..!



दैनिक आरंभ मराठीचा प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने गुरुवारी सायंकाळी धाराशिवमध्ये स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित आला होता. या कार्यक्रमात सामाजिक, राजकीय, साहित्य, कला, शिक्षण,शासकीय, शेती, पत्रकारितेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आरंभ मराठीला भरभरून शुभेच्छा दिल्या.
(छायाचित्र आरिफ शेख, आकाश तांबे)




























# विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून 'आरंभ मराठी'ला भरभरून शुभेच्छा..!



दैनिक आरंभ मराठीचा प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने गुरुवारी सायंकाळी धाराशिवमध्ये स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित आला होता. या कार्यक्रमात सामाजिक, राजकीय, साहित्य, कला, शिक्षण,शासकीय, शेती, पत्रकारितेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आरंभ मराठीला भरभरून शुभेच्छा दिल्या. (छायाचित्र आरिफ शेख, आकाश तांबे)




























# विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून 'आरंभ मराठी'ला भरभरून शुभेच्छा..!



दैनिक आरंभ मराठीचा प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने गुरुवारी सायंकाळी धाराशिवमध्ये स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित आला होता. या कार्यक्रमात सामाजिक, राजकीय, साहित्य, कला, शिक्षण,शासकीय, शेती, पत्रकारितेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आरंभ मराठीला भरभरून शुभेच्छा दिल्या.
(छायाचित्र आरिफ शेख, आकाश तांबे)

























